मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# स्वच्छ सुंदर शहरासाठी वाढला नागरिकांचा सहभाग

## पिंपरी-चिंचवड शहरात नागरिकांच्या सोबतीने साप्ताहिक स्वच्छता मोहीम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या जनजागृती मोहिमेअंतर्गत संपूर्ण शहरात साप्ताहिक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विशेषतः भाजी मंडई, सार्वजनिक स्वच्छतागृहे व त्याच्या आसपासच्या परिसरांमध्ये स्वच्छता उपक्रम राबवून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमांतर्गत 'ह' क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक ३२ राजीव गांधी भाजी मंडई, जुनी सांगवी येथे विशेष स्वच्छता मोहिमेचे राबविण्यात आली.

या मोहिमेत पिंपरी चिंचवड महापालिका सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक दीपक कोटीयान,आरोग्य निरीक्षक संदीप राठोड, आरोग्य मुकादम वैशाली रणपिसे व नारायण शितोळे यांच्यासह अन्य महापालिका कर्मचारी आदी सहभागी झाले होते.




स्वच्छता मोहिमेदरम्यान नागरिकांना डेंग्यू व मलेरिया या रोगांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच, प्रतिबंधक उपाययोजना, घराच्या व परिसराच्या स्वच्छतेसाठीच्या सवयी, कचरा विलगीकरणाचे महत्त्व, एकल प्लास्टिक टाळण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी कापडी पिशव्यांच्या वापराचा आग्रह धरून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले.

परिसरातील पालापाचोळा, गवत, प्लास्टिक, कागद, पुठ्ठा यांसारख्या कचऱ्याचे संकलन करून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. मोहिमेमध्ये स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत महापालिकेला सहकार्य केले.

### जनजागृतीसाठी लोककलेचा प्रभावी वापर

» स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महापालिकेच्या वतीने पथनाट्य, भारुड व इतर लोककला सादर करण्यात आल्या. या सादरीकरणांद्वारे कचरा व्यवस्थापन, प्लास्टिक बंदी, सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

"पिंपरी-चिंचवड शहर स्वच्छ व सुंदर राहावे यासाठी महापालिका स्वच्छतेसोबत विविध माध्यमातून सातत्याने जनजागृती करत आहे. नागरिकांनीही स्वच्छतेबाबत महापालिकेस सहकार्य करून स्वच्छतेमध्ये मोलाचे योगदान द्यावे.

**- सचिन पवार, उप आयुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# पत्रकारांच्या हक्कांसाठी आमदार जगतापांची लक्षवेधी

## आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील पत्रकारांच्या सामाजिक, आर्थिक आणि व्यावसायिक हक्कांसाठी विधानसभेत ठोस पाऊल उचलत आमदार शंकर जगताप यांनी लक्षवेधी सूचना क्रमांक २४७३ द्वारे पत्रकारांच्या समग्र हितासाठी महत्वाची मागणी सादर केली. त्यांनी पत्रकारांसाठी स्वतंत्र 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कल्याणकारी महामंडळ' स्थापन करून त्याअंतर्गत विविध सुविधा पुरविण्याचा आग्रह धरला.




राज्यातील इलेक्ट्रॉनिक, डिजिटल, आकाशवाणी तसेच अन्य प्रसारमाध्यमांमधील पूर्णवेळ, अर्धवेळ व अंशकालीन पत्रकारांसाठी शासनाने एक सर्वसमावेशक धोरण तयार करावे, अशी मागणी जगताप यांनी जोरदारपणे मांडली.

कामगारमंत्री यांच्या उत्तरानुसार, केंद्र सरकारने २००८ मध्ये पारित केलेल्या असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियमांतर्गत पत्रकारितेसह विविध क्षेत्रांना कव्हर करण्यात आले आहे. राज्यातही ६ जुलै २०२३ रोजी 'महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळ' स्थापन करण्यात आले असून, पत्रकारिताही त्यात समाविष्ट आहे. भविष्यात महामंडळाच्या माध्यमातून आरोग्य विमा, अपघात विमा, शिष्यवृत्ती, निवृत्तीवेतन इ. योजना पत्रकारांना लागू होतील, असे शासनातर्फे स्पष्ट करण्यात आले.

पत्रकार व पत्रकारेतर कर्मचाऱ्यांना मजिठिया वेतन आयोगाच्या शिफारशी लागू असून, त्यांना कामगार कायद्यातील सर्व सुविधा प्राप्त आहेत. औद्योगिक विवाद अधिनियम, बोनस, उपदान, भविष्यनिर्वाह निधी इत्यादी कायद्यातील तरतुदी पत्रकार कर्मचाऱ्यांनाही लागू होतात, असे मंत्री महोदयांनी सांगितले.

### महामंडळ स्थापण्याची मागणी..

» शंकर जगताप यांनी नमूद केले की, देशात पत्रकार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात महाराष्ट्रात अद्याप अशी रचना अस्तित्वात नाही. त्यामुळे 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कल्याणकारी महामंडळ' स्थापन करून त्यासाठी स्वतंत्र अधिकारी, कार्यालय आणि निधीची तरतूद करण्यात यावी.

# पुरंदर परिसरात बोगस दस्तानोंदणी!

## महसूलमंत्र्यांची माहिती; प्रस्तावित विमानतळामुळे जमिनींना भाव

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित विमानतळामुळे जमिनीचे भाव वाढले आहेत. त्या पार्श्वभूमीवर, या परिसरातील गावांमध्ये बोगस दस्तनोंदणी होत आहे का, असा प्रश्न विधानसभेत उपस्थित केला असता, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तसे काही प्रकार झाल्याचे सांगितले.

शहरालगतचा प्रस्तावित रिंग रोड आणि पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पुरंदर तालुक्यातील जमिनींची मागणी वाढली आहे. त्यातच पुरंदर तालुक्यामध्येच विमानतळ होणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर येथील जागा खरेदी-विक्रीच्या व्यवहारात लक्षणीय वाढ झाली आहे.

विमानतळाच्या भूसंपादनाची अधिसूचना जाहीर झाल्यानंतर विमानतळासाठी ज्या सात गावांमध्ये विमानतळ होणार आहे, त्यालगतच्या गावांमधील जमिनीला सोन्याचा भाव आला आहे. या संदर्भात आमदार आशिष देशमुख यांनी तारांकित प्रश्नाद्वारे विमानतळ परिसरातील गावांमधील बोगस दस्तनोंदणीच्या प्रकाराचा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली.



‘पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित नवीन विमानतळामुळे जमिनींचे भाव वाढल्याने गेल्या काही महिन्यांपासून विमानतळ परिसरातील गावांमध्ये बोगस दस्तनोंदणीचे प्रकार होत आहेत का? बोगस दस्तनोंदणी होत असल्यास बनावट कागदपत्रांद्वारे नव्या खरेदीदाराचे नाव अधिकाऱ्यांच्या संगनमताने सातबारा उताऱ्यावर लावण्यात येत असल्याची बाब खरी आहे का? याप्रकरणी किती गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे? त्याचा तपशील काय आहे? या सर्व प्रकाराबाबत राज्य शासनाने काय चौकशी केली? आणि कोणावर कोणती कारवाई केली,’ अशी विचारणा देशमुख यांनी बावनकुळे यांच्याकडे केली.

त्यावर बावनकुळे यांनी उत्तर दिले, ‘विमानतळामुळे बोगस दस्तनोंदणी होत असून, पुरंदर येथील दुय्यम निबंधक श्रेणी-१ यांच्या कार्यालयात मार्च महिन्यामध्ये मौजे खानवडी येथील शेतजमिनीचे साठेखत २५०१/२२५ या क्रमांकाने मूळ मालकाऐवजी नोंदणीकृत झाले आहे. मात्र, बनावट कागदपत्रांद्वारे नव्या खरेदीदाराचे नाव अधिकाऱ्यांच्या संगनमताने सातबारा उताऱ्यावर लावण्यात आलेले नाही, तर मूळ व्यक्तीऐवजी बनावट व्यक्ती असल्याचे स्पष्ट झाल्याने दुय्यम निबंधकांकडून नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी सासवड पोलीस स्थानकाला पत्राद्वारे सूचना करण्यात आली आहे.’

दरम्यान, विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावांमधील २ हजार ६७३ हेक्टर भूसंपादन केले जाणार आहे. या परिसरात एक गुंठ्यापासून अकरा गुंठ्यांपर्यंतचे प्लॉटिंग करण्यात आल्याची चर्चा आहे. तर दिवे, चांबळी, सोनोरी आणि गराडे या गावांमधील रिंग रोड प्रस्तावित आहे. रिंग रोडसाठी बहुतांश भूसंपादन झाले आहे. रिंग रोडसाठी संपादित झालेल्या जमिनींना समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर पाचपट दर देण्यात आला आहे.

### पुरंदर परिसरात प्रकार उघड

- **प्रसंग :** पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि रिंग रोडमुळे जमिनीचे भाव प्रचंड वाढले.
- **मुख्य मुद्दा :** विमानतळ प्रकल्पामुळे शेतजमिनींची मागणी वाढली असून, त्यामुळे बोगस दस्तनोंदणीच्या घटना घडत असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत स्पष्ट केले.
- **विधानसभा प्रश्न :** आमदार आशिष देशमुख यांनी बोगस दस्तनोंदणीविषयी तारांकित प्रश्न उपस्थित केला. मौजे खानवडी येथील शेतजमिनीचे साठेखत क्रमांक २५०१/२२५ हे खरेदीदाराच्या नावाने नोंदवण्यात आले.

# रेल्वे अपघातांतील चुकांचे आता होणार ‘ट्रॅकिंग’

## अपघाताला दोषी कोण? हे लगेच समजणार; पुणे विभागात 74 स्थानकांवर बसणार ‘रेकॉर्डिंग युनिट्स’

**पुणे | प्रतिनिधी**

रेल्वे अपघातांची कारणे शोधणे आणि दोषी निश्चित करणे, हे आता अधिक सोपे होणार आहे. मध्य रेल्वेच्या पुणे विभागाने रेल्वे स्थानकांवर व्हीएचएफ (व्हेरी हाय फ्रीक्वेन्सी डिव्हाइस) उपकरणांसोबत 74 रेकॉर्डिंग युनिट्स बसवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे रेल्वे परिचालनादरम्यान स्टेशन मास्टर्स, ट्रेनचालक आणि गार्ड यांच्यातील संवादाची नोंद ठेवली जाईल. त्यामुळे अपघातांच्या चौकशीत मोठी मदत होणार आहे.



रेल्वेगाड्यांच्या संचलनादरम्यान स्टेशन मास्टर्स आणि कंट्रोलर व्हीएचएफ डिव्हाइसचा वापर करून मार्गावरील रेल्वे चालक आणि गार्ड यांच्याशी संवाद साधतात. पोलिसांच्या वॉकी-टॉकीप्रमाणेच हे डिव्हाइस कार्य करते. त्यामुळे रेल्वेला कोणत्या ट्रॅकवर घ्यावे, कुठे थांबावे, किंवा आपत्कालीन परिस्थितीत कधी थांबावे, अशा महत्त्वाच्या सूचना दिल्या जातात. मात्र, जर चुकीची सूचना मिळाली आणि त्याच वेळी सिग्नलिंग यंत्रणेत बिघाड झाला, तर मोठ्या अपघाताची शक्यता असते.

अशा वेळी नेमकी चूक कोणाची होती, हे शोधणे कठीण होते. या समस्येवर मात करण्यासाठी, आता रेल्वे स्थानकांवर व्हीएचएफद्वारे होणाऱ्या संवादांचे रेकॉर्डिंग केले जाणार आहे. हे रेकॉर्डिंग युनिट्स अपघाताच्या वेळी नेमकी चूक कोणाची होती.

रेल्वे चालक-गार्डची की, त्यांना चुकीच्या सूचना मिळाल्यामुळे अपघात झाला, हे शोधणे सोपे करेल. पुणे विभागातील 74 रेल्वे स्थानकांवर हे रेकॉर्डिंग युनिट्स बसवण्यात येणार आहेत. यामुळे भविष्यात दुर्दैवाने कोणताही अपघात झाल्यास, त्याचे कारण तत्काळ समोर येईल.

### महत्त्वाचे मुद्दे

- रेल्वे बोर्डाची मंजुरी
- रेकॉर्डिंग तीन महिन्यांपर्यंत होणार जतन
- सुमारे पाच कोटी रुपयांपर्यंत खर्च अपेक्षित
- पहिल्यांदाच रेल्वे ट्रेनचालक, रेल्वे स्थानक कंट्रोल रूममधील संवादाचे रेकॉर्डिंग
- विमानाच्या ब्लॅक बॉक्सप्रमाणे करणार काम

# बिल्डरचा प्रताप... नैसर्गिक नाला बुजवला

## बिल्डरने नाल्याची भिंत परस्पर पाडली; आरसीसी पाईप टाकून नाला बंदिस्त केल्याचा पालिकेचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाकड येथील एका बांधकाम व्यावसायिकाने नैसर्गिक नाल्याची सीमाभिंत परस्पर पाडल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यानंतर नाल्यामध्ये आरसीसी पाईप टाकून हा नालाच बंदिस्त करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर त्यावर बांधकामासाठी लागणारे लोखंडी साहित्य आणि अन्य सामग्री टाकून नाल्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण करण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने याची गंभीर दखल घेतली असून हे साहित्य काढून नाल्याचा प्रवाह मोकळा न केल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. सध्यस्थितीमध्ये पावसाळा सुरू असून नाला बंदिस्त केल्याने पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होत आहे.

मुसळधार पावसामुळे हिंजवडीसह वाकडमध्ये पुरसदृश स्थिती निर्माण झाली होती. अनेकदा परिसरातील नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरते. वाकडमधील हा नाला बंद करण्यात आल्यामुळे पुन्हा एकदा पुराचा धोका निर्माण झाला आहे. हा नाला बंदिस्त केला जात असताना पालिका अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप केला जाऊ लागला आहे. पालिका कार्यक्षेत्रातील वाकड सर्व्हे नं.१७२/२ पैकी व १७५/ ३ पैकी या ठिकाणी मे. संस्कृती अँड एसेन असोसिएट्स या बांधाकम कंपनीला बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडून बांधकाम परवाना देण्यात आला आसून त्याचा क्रमांक बीपी, वाकड १४१/ २०२२ नुसार परवानगी दिलेली आहे.

मात्र, संस्कृती अँड एसेन असोसिएट्स यांनी इमारतीचे खोदकाम करताना नैसर्गिक नाल्याची भिंत जाणिवपूर्वक पाडल्याचे आणि त्यानंतर नैसर्गिक नाल्यात आरसीसी पाईप टाकून नाला बंदिस्त केल्याचे पालिकेच्या पाहणीत समोर आले आहे. यासंदर्भात, सूर्यकांत सरवदे यांनी तक्रार केली आहे. साधारणपणे दीडशे ते दोनशे मीटर नाला बंदिस्त करण्यात आलेला आहे. त्यानंतर, नाल्यावर बांधकामाचे लोखंडी साहित्य, अन्य सामग्रीदेखील टाकण्यात येत आहे. त्यामुळे नाल्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होत आहे.



### रस्त्यावर, भुयारी मार्गात पाणी साचून बनते तळे

» वाकड परिसरातील वाढते नागरीकरण, लोकसंख्या वाढ आणि झपाट्याने वाढ चाललेली सिमेंट इमारती यामुळे ड्रेनेज लाईन कालबाह्य झालेली आहे. शहरात सांडपाणी निचरा करणारी जलनिस्सारण लाईन व्यवस्थादेखील जुनी होऊन त्याला गळती लागलेली आहे. तर नैसर्गिक नाले पाईपलाईन टाकून बुजविले गेले आहेत. अनेक ठिकाणी नाल्यांवरच बांधकामे केली आहेत. त्यामुळे ड्रेनेजलाईन वारंवार तुंबणे, पावसाळ्यात पाण्याचा योग्य निचरा न होणे, लोकवस्ती पाणी शिरणे आणि रस्त्यावर, भुयारी मार्गात पाणी साचून तळे निर्माण होऊ लागले आहे.

### अनेक बिल्डरकडून नैसर्गिक प्रवाहांवर घाला

» महापालिकेच्या हद्दीतील वाकड परिसरात अनेक रस्त्यावर व सखल भागात पाणी साठू लागले आहे. अचानक पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे पुरसदृश परस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे जलनिस्सारण विभागाकडून शहरातील नैसर्गिक ओढे व नाल्याचे सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात अनेक नैसर्गिक नाले, ओढ्यावर अतिक्रमण करत बांधकामे झाल्याचे बाब समोर आली आहे. बिल्डरांनी नैसर्गिक ओढे व नाल्यावर अतिक्रमण आणि बांधकामे करून बुजवले आहेत. त्याकडे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून दुर्लक्ष होत आहे.

> “ महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता नैसर्गिक नाल्यात आरसीसी पाईप टाकून नाला बंदिस्त करण्यात आलेला आहे. हे बंदिस्त आरसीसी पाईप तत्काळ काढण्यात यावेत. बिल्डिंगचे खोदकाम करताना नाल्याची भिंत पाडण्यात आलेली आहे. त्यामुळे नाल्याच्या प्रवाहास अडथळा निर्माण झालेला आहे. त्या नाल्याची सीमाभिंतदेखील तत्काळ बांधण्यात यावी, अन्यथा कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.
>
> -सुनील शिंदे, कार्यकारी अभियंता, ड क्षेत्रीय कार्यालय, महापालिका

# ऑनलाइन मालमत्ता कर भरणा मोहीमेला प्रतिसाद

## तब्बल 4 लाख 28 हजार मालमत्ता धारकांनी मिळून एकूण 544 कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणात ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरला आहे. १ एप्रिल ते १६ जुलै या कालावधीत तब्बल ४ लाख २८ हजार मालमत्ता धारकांनी मिळून एकूण ५४४ कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे.

मालमत्ता कर हा महापालिकेचा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत असून शहरात सुमारे ६ लाख ३० हजार मालमत्ता आजमितीस नोंदल्या गेल्या आहेत. शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा 6 लाख 32 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभाग कर वसूल करत आहे. गतवर्षी या विभागाच्या वतीने राबविलेल्या विविध उपक्रमात जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे कारवाई सुरु आहे. महापालिकेच्या वतीने १ एप्रिल ते ३० जून २०२५ या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना १० टक्के सवलतीची सुविधा देण्यात आली होती. या सवलतीचा लाभ ३ लाख २३ हजार २३९ मालमत्ताधारकांनी घेतला.

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांसाठी ३० जून २०२५ पर्यंत संपूर्ण कराचा भरणा ऑनलाइन स्वरूपात केल्यास १० टक्के सवलत व कुटुंबातील महिलेच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेवर ३० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येत आहे. तसेच ज्या मालमत्ताधारकांना यावेळी सवलत घेता आली नाही, त्यांच्या सोयीसाठी महापालिकेने १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना ४ टक्के सवलत जाहीर केली आहे. नागरिक विविध पर्यायांचा वापर करून कर भरणा करत आहेत. ऑनलाइन प्रणाली, कॅश काउंटर, ईडीसी, आरटीजीएस, डिमांड ड्राफ्ट, BBPS अशा माध्यमातून कर भरणा सुरू आहे.




### अशी झाली रक्कम जमा

- » ऑनलाइन : ३९४ कोटी ३३ लाख,
- » रोख रक्कम : ३२ कोटी ७० लाख ८० हजार
- » धनादेश : २५ कोटी ६१ लाख २३ हजार
- » ईडीसी : ६ लाख ६ हजार
- » आरटीजीएस : २४ कोटी ६२ लाख ८५ हजार
- » डीडी : ७४ लाख ३२ हजार
- » BBPS - १७ लाख ८३ हजार मालमत्ता कर

# माजी आमदार 'घड्याळ' बांधण्याच्या तयारीत? चर्चांना उधाण

## पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप यांना गळाला लावण्यात भाजपला यश आलं

**पुणे | प्रतिनिधी**

भाजपने पुणे जिल्ह्यात आपली ताकद वाढवायला सुरूवात केली आहे. येत्या काही महिन्यांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागणार असल्याने आत्तापासूनच भाजपने जोरदार तयारी सुरू केली आहे. काँग्रेसशी एकनिष्ठ असलेले माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काही महिन्यांपूर्वी भाजपची कास धरली.

नुकताच पुणे जिल्ह्यातील काँग्रेसचं मोठं नाव पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप यांना गळाला लावण्यात भाजपला यश आलं. त्यांनीही आपल्या हाती कमळ घेतलं आहे. या सगळ्या घडामोडी होत असताना दौंडमधून राजकीय बातमी समोर आली आहे.

आगामी काळात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित दादांकडून राष्ट्रवादीची ताकद वाढविण्यावर भर दिला जात असल्याचे दिसत आहे. पुणे जिल्हा परिषद आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या निवडणुका देखील होणार आहेत.

यामुळे आगामी काळात जर रमेश थोरात यांनी शरद पवारांची साथ सोडल्यास शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसू शकतो. याचा परिणाम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत होऊ शकतो असे सांगितले जात आहे.

भाजप आपली ताकद वाढवत असतानाच आता येत्या काळात दौंडमध्ये मोठा राजकीय भूकंप होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दौंडचे माजी आमदार आणि शरद पवार यांचे विश्वासू रमेश थोरात लवकरच आपल्या हाती 'घड्याळ' बांधणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. त्याअनुषंगाने रमेश थोरात यांच्या कार्यकर्त्यांच्या बैठकादेखील सुरू असल्याची माहिती आहे.

भाजपने पुणे जिल्ह्यात आपली ताकद वाढवायला सुरूवात केली आहे. येत्या काही महिन्यांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागणार असल्याने आत्तापासूनच भाजपने जोरदार तयारी सुरू केली आहे



### शरद पवारांना धक्का?

» यामुळे आगामी काळात जर रमेश थोरात यांनी शरद पवारांची साथ सोडल्यास शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसू शकतो. याचा परिणाम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत होऊ शकतो असे सांगितले जात आहे. यामुळे या संपूर्ण राजकीय गणितांचा विचार करता रमेश थोरात काय निर्णय घेणार हे पाहणे अत्यंत महत्वाचे असणार आहे.

### पक्षप्रवेशासाठी आग्रह

» आगामी काळात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित दादांकडून राष्ट्रवादीची ताकद वाढविण्यावर भर दिला जात असल्याचे दिसत आहे. पुणे जिल्हा परिषद आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या निवडणुका देखील होणार आहेत. याच पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी रमेश थोरात यांना पक्षप्रवेशासाठी आग्रह धरला असल्याच्या चर्चा होत आहेत.

### रमेश थोरात यांच्याविषयी...

- » १९७८ ते १९९०- सरपंच, खुटबाव ग्रामपंचायत
- » १९८४ पासून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक
- » १९८५- १९८७- उपाध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
- » १९९०- २०२१- सहा वेळा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष
- » १९९२- २००२- उपाध्यक्ष, भीमा सहकारी साखर कारखाना, मधुकरनगर- पाटस
- » २००१- २००९- संचालक, पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (कात्रज)
- » २००९- २०१४- आमदार (अपक्ष)

# चितळ, हरणे 'क्वारंटाईन'! साथीच्या भीतीने प्रशासन सतर्क

## संभाव्य साथीच्या आजाराचा प्रसार रोखण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राजीव गांधी प्राणिसंग्रहालयातील सोळा चितळांच्या अचानक मृत्यूने खळबळ उडाली असून, प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना करीत उर्वरित चितळांना 'क्वारंटाईन' केले आहे. संभाव्य साथीच्या आजाराचा प्रसार रोखण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे. सध्या मृत्यूचे कारण अस्पष्ट असले, तरी तपासणी अहवाल येईपर्यंत अत्यंत खबरदारी प्राणिसंग्रहालय प्रशासनाकडून घेतली जात आहे.

शुक्रवारी राजीव गांधी प्राणिसंग्रहालयात पाहणी केली. त्यानंतर प्रतिनिधींनी येथील संचालक डॉ. राजकुमार जाधव आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. घनश्याम पवार यांच्याशी संवाद साधला. याप्रसंगी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, चितळांचा इतर प्राण्यांशी संपर्क पूर्णपणे थांबवला आहे.

चितळांसाठी स्वतंत्र 'ॲनिमल कीपर'ची (कर्मचारी) नेमणूक करण्यात आली आहे. याशिवाय, चितळांच्या खंदकात प्रवेश करण्यापूर्वी सॅनिटायझर आणि जंतुनाशकाचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. खंदक परिसराचे ब्लिचिंग पावडरने निर्जंतुकीकरण करण्यात आले आहे.

चितळांना माणसांच्या सततच्या संपर्कामुळे येणारा ताण कमी करण्यासाठी त्यांच्या खंदकांवर हिरवे कापड टाकून आच्छादन करण्यात आले आहे. तसेच, खंदकात फक्त एकाच कर्मचाऱ्याला प्रवेश दिला जात आहे. इतर कर्मचाऱ्यांच्या हालचाली थांबवण्यात आल्या आहेत. याशिवाय चितळांच्या खंदकात काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला इतर प्राण्यांच्या खंदकात जाण्यास बंदी केली आहे.



> “चितळांचा इतर प्राण्यांशी संपर्क होऊ नये, याची आम्ही विशेष काळजी घेत आहोत. आम्ही इतरकर्मचाऱ्यांना चितळाच्या खंदकात ये-जा करण्यापासून रोखले आहे. यासाठी आम्ही एक स्वतंत्र ॲनिमल कीपर नियुक्त केला असून, तोच कर्मचारी चितळ हरणांच्या खंदकातील सर्व काम पाहत आहे. या कर्मचाऱ्याला देखील इतर प्राण्यांच्या खंदकात जाण्यास मनाई आहे.
>
> - डॉ. राजकुमार जाधव, संचालक, राजीव गांधी प्राणिसंग्रहालय

> “चितळ प्राण्यांच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आम्ही तपासणीसाठी जैविक नमुने विविध प्रयोगशाळांमध्ये पाठवले आहेत आणि त्यांचा अहवाल येत्या दोन-तीन दिवसांत येणे अपेक्षित आहे. या अहवालानंतरच त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण समोर येईल. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून आम्ही चितळांच्या खंदकाचे प्रवेशद्वार आणि संपूर्ण परिसर निर्जंतुकीकरण केले आहे.
>
> - डॉ. घनश्याम पवार, पशुवैद्यकीय अधिकारी, प्राणिसंग्रहालय